Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 22/10/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष


**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## संसदपटू, देशभक्त विठ्ठलभाई पटेल



विठ्ठलभाई जव्हेरभाई पटेल हे एक थोर देशभक्त व श्रेष्ठ संसदपटू होते. पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून गाजलेले विठ्ठलभाई पटेल हे सरदार वल्लभभाई पटेल यांचे वडीलबंधू होत. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८७१ रोजी खेड जिल्ह्यातील करमसद या गावी झाला. मुंबईत वकिलीच्या परीक्षेत भरघोस यश मिळवून त्यांनी गोध्रा येथे वकिली सुरू केली व वल्लभभाईंच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. पुढे दोघेही बंधू १८९८ पासून बोरसदला वकिली करू लागले. आठ वर्षे चांगली वकिली केल्यानंतर विठ्ठलभाई १९०५ मध्ये वल्लभभाईंच्या व्ही. जे. पटेल या नावाने मिळालेल्या पारपत्रावर बॅरिस्टर होण्याकरिता इंग्लंडला गेले व बॅरिस्टर होऊन परतले (१९०८). लंडनमध्ये दादाभाई नौरोजींच्या मार्गदर्शनाखाली भारतीय प्रश्नांचा त्यांनी अभ्यास केला. स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी वृत्तपत्रे, व्यासपीठ व कायदेमंडळ यांचा सम्यक उपयोग केला पाहिजे ही शिकवणूक त्यांना दादाभाईंकडून मिळाली.

मुंबईला परत आल्यावर पुन्हा वकिली सुरू केली व १९११ साली मुंबई कायदेमंडळात ते निवडून आले. १९१६ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे, या उद्देशाने त्यांनी एक विधेयक मांडले. असहकारितेच्या आंदोलनातील विधिमंडळ-बहिष्कार पटेलांना मान्य नव्हता; पण त्यांनी पक्षशिस्त पाळली. विधिमंडळाचा राजीनामा दिला व निवडणुकीला ते पुन्हा उभे राहिले नाहीत. पुढे ते स्वराज्य पक्षात गेले. १९२३ च्या नागपूर झेंडा सत्याग्रहात विठ्ठलभाई एक पुढारी होते. त्यांच्याच मुत्सद्दीपणामुळे तो सत्याग्रह यशस्वी झाला. १९२२ मध्ये ते मुंबई महानगरपालिकेमध्ये निवडून आले. त्यांच्या प्रयत्नाने शाळांतून हिंदी शिकविण्यास सुरुवात झाली. सर्व खात्यांत स्वदेशी माल घेण्याचे धोरणही त्यांच्यामुळेच स्वीकारले गेले. अशा या थोर देशभक्ताचे २२ ऑक्टोबर १९३३ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Oct 22, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401